# वैद्यकीय संशोधनावर भर देण्याची गरज

## उद्योजक बाबा कल्याणी : नेत्रतज्ज्ञांच्या परिषदेचे उद्‌घाटन

**पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) -** उत्तम वैद्यकीय ज्ञान असणारे तज्ज्ञ देशात असले तरी शस्त्रक्रियेनंतर अनेकदा मोठे प्रश्न निर्माण होतात. त्यासाठी सहाय्यक वैद्यकीय कर्मचारी, परिचारिका यांना चांगले प्रशिक्षण देणे आवश्यक असून वैद्यकीय क्षेत्रात संशोधनावर भर देणे महत्त्वाचे आहे, असे मत प्रसिद्धी उद्योगपती बाबा कल्याणी यांनी व्यक्त केले.

इंटरनॅशनल सोसायटी फॉप मॅन्युअल स्मॉल इन्सिजनकॅट्रॅक्ट सर्जरीच्या वतीने नेत्रतज्ज्ञांच्या आठव्या जागतिक परिषदेचे उद्‌घाटन बाबा कल्याणी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र नेत्रतज्ज्ञ संघटना आणि पुणे नेत्रतज्ज्ञ संघटनेच्या सहकार्याने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ संगीतकार पंडीत हृदयनाथ मंगेशकर हे परिषदेचे प्रमुख पाहुणे होते. यावेळी डॉ. एन. एस. डी. राजू, डॉ. के. पी. एस. मलिक, आंतरराष्ट्रीय परिषदेचे अध्यक्ष डॉ.अमुल्य साहू, डॉ. सलील गडकरी, डॉ. देबाशिष भट्टाचार्य, डॉ. परिक्षित गोगटे, डॉ. प्रकाश मराठे आणि पुणे नेत्रतज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. माधव भट उपस्थित होते.




**पुणे :** ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. श्रीकांत रानडे यांना जीवनगौरव पुरस्कार देताना डॉ. माधव भट. यावेळी उपस्थित डॉ. एन. एस. डी. राजू, डॉ. के. पी. एस. मलिक, डॉ. अमुल्य साहू, बाबा कल्याणी व मान्यवर.

बाबा कल्याणी म्हणाले, आपल्याकडे सर्वच क्षेत्रांत काम करणाऱ्या अनेक जणांची प्रवृत्ती नियम आणि शिस्त न पाळण्याची असते. त्यामुळे आपलेच नुकसान होते. वैद्यकीय क्षेत्रात तर हे अत्यंत आवश्यक आहे. औद्योगिक क्षेत्राप्रमाणेच वैद्यकीय क्षेत्रात संशोधनावर भर दिल्यास रुग्ण चिकित्सेची आणि उपचारांची नवीन तंत्रे विकसित होऊन त्याचा रुग्णांना मोठ्या प्रमाणावर फायदा होण्यास मदत होईल.

दरम्यान, परिषदेच्या वतीने ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. श्रीकांत रानडे यांना ग्रामीण भागात उत्कृष्ट दर्जाची सेवा दिल्याबद्दल डॉ. माधव भट यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. माधव भट यांनी प्रास्ताविक केले. डॉ. कुलदीप डोळे आणि डॉ. मोनिका नाईक-निंबाळकर यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ.अमुल्य साहू यांनी आभार मानले.